**CNR No. MHRG 08-001422-2022**

दाखल तारीख : १९/१०/२०२२
नोंदणी तारीख : १९/१०/२०२२
निकाल तारीख : ०४/०३/२०२४
कालावधी :०१वर्षे ०३महिने २५दिवस

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७०५/२०२२** **निशाणी क्र.३३**

फॉर्म क्र. XXXII
**भाग 'अ'**
( Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual )

**न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग), खालापूर, कोर्ट नं.३ हयांचे न्यायालयात.**
( पिठासिन अधिकारी : ल. कि. सपकाळ )
पारित दिनांक ०४/०३/२०२४

**स.के. क्र. ७०५/२०२२**
( पहिली खबर क्र. २७६/२०२२, दिनांक २२/०८/२०२२ )
( भा.दं.वि.सं.कलम २७९, ३०४–अ, ३३७, ३३८ आणि मो.वा.का.क. १८४ ३(१)/१८१, १४६/१९६ अन्वये )
खालापूर पोलिस स्टेशन.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी चे नाव | | **सरकार तर्फे,**<br>पोलिस स्टेशन अधिकारी,<br>खालापूर पोलिस स्टेशन. |
| प्रतिनिधीत्व | | श्री. के. आर. कांबळे,<br>सहा. सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी चे नाव | | **मिलींद रमण सावंत,**<br>वय ३४ वर्षे, धंदा – मजूरी,<br>रा. जांभिवली, ता. खालापूर, जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | | ॲड. श्री. सत्यवान तुकाराम वाडेकर,<br>आरोपीतर्फे वकिल. |

## भाग 'ब'

( Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual )

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १४/०८/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | १९/१०/२०२२ |
| दोषारोप निश्‍चित केल्याचा दिनांक | १७/०६/२०२३ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०४/१०/२०२३ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०९/०१/२०२४ |
| निकाल देण्यासाठी दिल्याचा दिनांक | ०४/०३/२०२४ |
| निकाल दिनांक | ०४/०३/२०२४ |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक ( असेल तर ) | ——— |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष / दोषी | किती शिक्षा सुनविण्यात आली | चौकशी दरम्यान तुरूंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मिलींद रमण सावंत | १९/१०/२०२२ | १९/१०/२०२२ | भा.दं.वि.सं. कलम २७९, ३०४—अ, ३३७, ३३८ आणि मा.वा.का.क. १८४ ३(१)/१८१, १४६/१९६ अन्वये | निर्दोष | निरंक | |

## भाग 'क'

( Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual )

**अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ. क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार ( प्रत्यक्ष दर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| १) | विलास बबन वाघमारे | फिर्यादी |
| २) | जगदिश परशुराम वाघमारे | साक्षीदार |
| ३) | गुलजार युसूफमिया पटेल | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| ४) | अशोक जर्नादन जाधव | साक्षीदार |
| ५) | दत्ता गंगाराम कातकरी उर्फ वाघमारे | साक्षीदार |
| ६) | गुलाब योगेश कोळी | साक्षीदार |

**ब. बचावपक्ष** ( असेल तर ) :

| **अ. क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार**<br>( प्रत्यक्ष दर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | --- | |

**क. न्यायालयाचे साक्षीदार** ( असेल तर ) :

| **अ. क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार**<br>( प्रत्यक्ष दर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | --- | |

**अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष :**

| **अ. क्र.** | **साक्षीदार क्र.** | **निशाणी क्र. व तपशिल** |
|---|---|---|
| १) | साक्षीदार क्र.१ | **नि.क्र.९** साक्ष, **नि.क्र.१०** फिर्याद. |
| २) | साक्षीदार क्र.२ | **नि.क्र.११** साक्ष. |
| ३) | साक्षीदार क्र.३ | **नि.क्र.१२** साक्ष. |
| ४) | साक्षीदार क्र.४ | **नि.क्र.१३** साक्ष. |
| ५) | साक्षीदार क्र.५ | **नि.क्र.२७** साक्ष. |
| ६) | साक्षीदार क्र.६ | **नि.क्र.२८** साक्ष. |

**ब. बचावपक्ष :**

| **अ. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशिल** |
|---|---|---|
| | --- | |

**क. न्यायालयाच्या निशाणी :**

| **अ. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशिल** |
|---|---|---|
| | --- | |

**ड. मुद्देमाल :**

| **अ. क्र.** | **साक्षीदार क्र.** | **आर्टीकल क्र. व तपशिल** |
|---|---|---|
| | --- | |

## : न्यायनिर्णय :

( दिनांक ०४/०३/२०२४ रोजी न्यायालयात घोषीत )

आरोपीविरूध्द प्रस्तूतचा खटला भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४—अ, ३३७, ३३८ आणि मो.वा.का.क. १८४, ३(१)/१८१, १४६/१९६ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांकरीता चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—**

२) दिनांक १४/०८/२०२२ रोजी १८:५० वाजण्याच्या सुमारास मौजे अजिवली गावाचे हद्‌दीत, खोपोली पेण रोडवर आरोपी मिलींद रमण सावंत हयाने त्याच्या ताब्यातील होंडा स्पलेंडर मोटार सायकल क्र. एम.एच. ०६, आर.७०६३ ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, हईगयीने, निष्काळजीपणे चालवून चेसीस क्र. MBLJAW224M9K01601 असलेली हिरो ग्लॅमर मोटार सायकल हिस समोरा—समोर ठोकर मारून अपघात करून मोटार सायकल वरील चालकाच्या मृत्युस कारणीभुत झाले. त्यामुळे खालापूर पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यात आली.

३) दाखल केलेल्या फिर्यादवरून गुन्हा रजिस्टर नंबर २७६/२०२२ नोंदविण्यात आला व तपास पुर्ण झाल्यानंतर खालापूर पोलीस स्टेशन अधिकारी हयांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र केले.

४) प्रस्तुतचा खटला संक्षिप्त पध्दतीने न चालविता अधिपत्र पध्दतीने चालविण्यात आला व त्यानुसार आरोपीवर निशाणी क्र.७ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीने त्यास गुन्हा कबूल नसल्याचे सांगून त्याच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप नाकारले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र.२३ वर नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

५) दोन्ही पक्षांच्या वकीलांचा युक्तीवाद व अभिलेखावर असलेल्या पुराव्याच्या आधारे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत आणि प्रत्येकावर मी माझे निष्कर्ष कारणांसोबत खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक १४/०८/२०२२ रोजी १८:५० वाजण्याच्या सुमारास मौजे अजिवली गावाचे हद्दीत, खोपोली पेण रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील होंडा स्पलेंडर मोटार सायकल क्र. एम.एच.०६, आर.७०६३ ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, हईगयीने, निष्काळजीपणे चालवून चेसीस क्र. MBLJAW224M9K01601 असलेली हिरो ग्लॅमर मोटार सायकल हिस समोरा—समोर ठोकर मारून अपघात करून मोटार सायकल वरील चालकाच्या मृत्युस कारणीभुत झाले, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| २) | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही स्वत: चालवित घेवुन जात असताना मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा कोणत्याही व्यक्तीला दुखापत अथवा क्षती पोहचेल इतक्या हयगयीने व बेदरकारपणे चालवून हिरो ग्लॅमर मोटार सायकल चालकास ठोकर मारून अपघात केला, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| ३) | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही मानवी जिवीत धोक्यात येईल व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून अपघात करून साक्षीदार हयांना किरकोळ स्वरूपाच्या दुखापती होण्यास कारणीभूत झाले, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |

| | |
|---|---|
| ४) उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही मानवी जिवीत धोक्यात येईल व इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून अपघात करून साक्षीदार हयांना गंभीर स्वरूपाच्या दुखापती होण्यास कारणीभूत झाले, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| ५) उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, बेदकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करून चालवली व अपघात केला, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| ६) उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही विना परवाना बेदकारपणे व निष्काळजीपूर्वक रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवली व अपघात केला, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| ७) उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील नमुद मोटार सायकल ही विमा नसताना सार्वजनिक रस्त्यावर चालवली व अपघात केला, हे अभियोग पक्षाने शाबित केले का? | नाही. |
| ८) आदेश काय? | सबळ पुराव्याअभावी आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## : <u>कारणमिमांसा</u> :

**<u>मुद्दा क्र. १ ते ७ करीता</u> :—**

६) वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा मी एकत्रीत देत आहे.

७) प्रस्तुत केसमधील मान्य असलेली वस्तुस्थीती म्हणजे अपघातात योगेश यशवंत कोळी हे मयत झाले आहेत. आरोपी तर्फे मयताचा मरणोत्तर पंचनामा निशाणी क्र.१४ व शवविच्छेदन अहवाल निशाणी क्र.१५ मान्य केले आहेत. त्यावरून योगेश यशवंत कोळी अपघातामध्ये मयत झाल्याचे शाबित होत आहे.

८) अभियोगपक्षातर्फे आरोपीविरूध्द दोषसिद्ध करण्यास एकुण सहा साक्षीदार तपासण्यात आले. अभियोगपक्षास वारंवार संधी देऊनही इतर साक्षीदार हयांना हजर ठेवण्यात आले नाही, म्हणून निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

९) आरोपीविरूध्द गुन्हयाचा दोषारोप शाबित होण्यासाठी आरोपीने घटनेवेळी त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, अविचाराने लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल तसेच रस्त्याच्या परीस्थीतीकडे दुर्लक्ष करून धोकादायक रित्या चालवुन योगेश यशवंत कोळी हयाच्या मृत्युस कारणीभुत झाला, हे गुन्हयाचे घटक अभियोगपक्षाने नि:संशयपणे शाबित करावयाचे आहेत.

१०) साक्षीदार क्र.१ विलास बबन वाघमारे, फिर्यादी हयांनी साक्ष जबाबात दिनांक १४/०८/२०२२ रोजी घटना घडली होती. ते व त्यांचा मित्र जगदीश वाघमारे असे त्यांच्या मोटार सायकलने क्रिकेट मॅच पाहण्याकरिता गेले होते. संध्याकाळी ६:३० वाजता मॅच संपल्यामुळे ते घरी येण्यासाठी आपटी वरून जांभळी हया मार्गाने मोटार सायकलने त्यांचा मित्र जगदीश वाघमारे सोबत निघाले. त्यांची मोटार सायकल ते स्वत: चालवित होते. योगेश कोळी व दत्ता कातकरी हे सुध्दा मोटार सायकल वरून त्यांच्या सोबत निघाले होते. त्यांच्या गाडीच्या पुढे योगेश व दत्ता कातकरी हयांची मोटार सायकल होती. मोटार सायकल योगेश चालवित होता. आजिवली गावाच्या एका सिमेंट पत्र्याच्या

दुकाना समोर त्यांची गाडी आली. त्यावेळेस मिलींद सावंत हयाने त्याच्या ताब्यातील एम.एच.०६/७१६३ ही मोटार सायकल समोरून चुकिच्या दिशेने घेवून आला. त्यामुळे मिलिंद सांवत व योगेश हयांच्या मोटार सायकलची ठोकर झाली. मिलींद सावंत, योगेश कोळी व दत्ता कातकरी हे रस्त्यावर खाली पडले. त्यांनी व जगदीश हयाने योगेश कोळी व दत्ता कातकरी हयांना खाजगी वाहनाने पेण येथे सरकारी दवाखान्यात औषध उपचारासाठी दाखल केले. रात्री ०१:३० च्या सुमारास त्यांना कळाले की, योगेश कोळी मयत झाला आहे व दत्ता कातकरी हयास एम.जी.एम. कामोठे येथे पुढील उपचाराकरिता दाखल केले आहे. त्यांनी निशाणी क्र.१० वरील घटनेची तक्रार दिली, असल्याचे कथन केले आहे.

११) साक्षीदार क्र.२ जगदीश परशुराम वाघमारे, हयांनी साक्षीदार क्र.१ हयांच्या साक्ष जबाबास दुजोरा देणारी साक्ष दिली आहे.

१२) साक्षीदार क्र.३ गुलजार युसूफमिया पटेल, हयांनी साक्ष जबाबात सन २०२२ मध्ये १४ तारखेला संध्याकाळी ६ च्या सुमारास ते हॉटेल मध्ये होते. मिलींद सावंत हा मोटार सायकल वरून पेण बाजूकडून खोपोली बाजूकडे येत होता. तसेच इतर दोघेजण खोपोली ते पेण हया दिशेने जात होते. मिलींद सावंत हा रस्ता ओलांडत असतांना, खोपोली ते पेण दिशेकडे जाणाऱ्या मोटार सायकलची धडक झाली. मोटार सायकलचे क्रमांक त्यांना सांगता येणार नसल्याचे सांगितले. जखमी हयांना बाजूला केले. पोलीसांनी त्यांचा जबाब नोंदविला असल्याचे कथन केले आहे. त्यांनी आरोपीस न्यायालयात ओळखले.

१३) साक्षीदार क्र.४ अशोक जर्नादन जाधव, हयांनी साक्ष जबाबात मागच्या वर्षी १४ तारखेला संध्याकाळी ६:३० च्या सुमारास ते दुकान बंद करत होते. त्यावेळेस पेण खोपोली रस्त्यावरती अपघात झाल्याचा आवाज

आला. त्यामुळे ते अपघात ठिकाणी गेले व जखमी हयांना बाजूला केले. जखमी हयाच्या नातेवाईकानी जखमी हयांना दवाखान्यात नेले. आरोपी त्याच्या मोटार सायकलवरती व दुसऱ्या मोटार सायकलवरती दोन व्यक्ती होते. हयाच्यात अपघात झाला होता, असे कथन केले आहे. त्यांनी आरोपीस न्यायालयात ओळखले.

१४) साक्षीदार क्र.५ दत्ता गंगाराम कातकरी उर्फ वाघमारे, हयांनी साक्ष जबाबात एक वर्षा पुर्वी घटना घडली होती. ते योगेशच्या मोटार सायकलवरती गेले होते. संध्याकाळी ६ वाजता ते गावाकडे वावोशी रोडने परत येत होते. योगेश गाडी चालवित होता. आरोपी मोटार सायकलने त्यांच्या गाडी समोर आला व त्यांच्या मोटार सायकलला धडक दिली त्यामुळे ते खाली पडले. अपघातात योगेशच्या डोक्याला मार लागला होता व ते बेशुध्द झाले होते. त्यांना एम.जी.एम. हॉस्पीटलला उपचाराकरिता नेण्यात आले होते. त्यांनी आरोपीस न्यायालयात ओळखले.

१५) साक्षीदार क्र.६ गुलाब योगेश कोळी, हयांनी साक्ष जबाबात दिड वर्षा पुर्वी घटना घडली होती. त्यांचे पती तांबाटी गावात क्रिकेट खेळण्याकरिता दत्ता सोबत गेले होते. सध्याकाळी ६ वाजता त्यांच्या मोटार सायकलने वावोशी रोडने घरी येत होते. आरोपी हयांने त्यांचे पती हयांच्या अंगावर मोटार सायकल घातली होती. त्यामुळे त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांचे पती हयांना एम.जी.एम. रूग्णालयात नेले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला, असे कथन केले आहे.

१६) अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.१ विलास बबन वाघमारे, साक्षीदार क्र.२ जगदीश परशुराम वाघमारे व साक्षीदार क्र.५ दत्ता गंगाराम कातकरी उर्फ वाघमारे हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांनी उलटतपासात रस्ता ओलांडताना आरोपीच्या गाडीला योगेशच्या

मोटार सायकलची धडक लागुन अपघात झाला असल्याचे कबूल केले आहे. तसेच आरोपीची गाडी ही समोरून आली नव्हती. साक्षीदार क्र.२ जगदीश परशुराम वाघमारे हयांनी उलट तपासात योगेश हयाने आरोपीच्या गाडीकडे न पाहिल्यामुळे योगेश हयाच्या मोटार सायकलने मिलींद सावंत हयांच्या मोटार सायकलला धडक दिली. योगेश कोळी हयांची गाडी वेगात असल्याने आरोपी हयांची गाडी रस्ता ओलांडत असतांना योगेश कोळी हयाला गाडीवरती नियंत्रण करता आले नसल्याचे कबूल केले आहे.

१७) साक्षीदार क्र.४ अशोक जर्नादिन जाधव व साक्षीदार क्र.६ गुलाब योगेश कोळी, हयांनी अपघात हा प्रत्यक्ष पाहिला नसल्याने त्यांच्या साक्ष जबाबावर विसंबून राहता येणार नाही.

१८) अभियोग पक्षास वारंवार संधी देवूनही अभियोगपक्षातर्फे तपासी अंमलदार हयांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे जप्ती/घटनास्थळ पंचनामा शाबित झालेला नाही. आरोपीच्या गाडीचा वेग, घटनास्थळाची परिस्थिती तसेच त्याने कशा पध्दतीने गाडी चालवली व ती निश्चित बेदरकारपणे होती, हयाबाबत पुरक कागदोपत्री पुरावा अभियोगपक्षाने दाखल केलेला नाही. अपघातातील वाहनांचा तांत्रिक तपासणी अहवाल निशाणी क्र.२१ व २२ आरोपीतर्फे मान्य करण्यात आलेला आहे. सदर तांत्रिक तपासणी अहवाल अभियोगपक्षाच्या कथनास पुरक नाही, म्हणून ते अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही. प्रकरणात घटनास्थळाचे दाखल छायाचित्र शाबित करण्यात आलेले नाही. रस्त्याची परिस्थिती दर्शविणारा पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. अपघातग्रस्त वाहनाचे छायाचित्र प्रकरणात शाबित करण्यात आलेले नाही. आरोपीने हयगयीने, अविचाराने व निष्काळजीपणे गाडी चालवली हे आलेल्या पुराव्या वरून नि:संशयपणे शाबित होत नाही. त्यामुळे योगेश यशवंत कोळी हयांच्या मृत्युस दायित्व आरोपीवर येणारे नाही.

१९) एकंदरित परिस्थीतीजन्य पुरावा व साक्षीदारांचे कथनातून अपघातातील अभियोगपक्ष आरोपी विरूध्दचा गुन्हा शाबित करण्यात पुर्णतः अपयशी ठरलेला आहे. अपघातातील वाहनाचे किती व कोणते नुकसान झाले, हयाबाबतचा ही कोणताही पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही.

२०) अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व बाबी सुस्पष्ट, सुसंगत, पुराव्याच्या अभावी शाबित केलेले नाही. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ८ करिता:—</u>**

२१) सदर प्रकरणामध्ये आरोपी विरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा सादर न झाल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.८ चे उत्तर खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी मिलींद रमण सावंत हयांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४—अ, ३३७, ३३८ आणि मा.वा.का.क. १८४, ३(१)/१८१, १४६/१९६ खाली शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांच्या आरोपांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल झाल्यास हजर राहण्याबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ प्रमाणे रक्कम रूपये १५,०००/—रू. चा जामीन दयावा.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.**

**Sd/-**
(ल. कि. सपकाळ)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र.३, खालापूर.

ठिकाण :— खालापूर.
दिनांक :— ०४/०३/२०२४.